# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १९/०३/२०१८

मा. स्थायी समिती सभा
सभा सूचना क्र. ११

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती** .........................................................
**स्थायी समिती सदस्य/सदस्या,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. २३/०३/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ११ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. सभापती, स्थायी समिती यांच्या मान्यतेने.

**(वासुदेव शिरवळकर)**
**प्र. नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २३/०३/२०१८ सभा सुचना क्र. ११ विषय पत्रिका

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | **मागील सभांचे** इतिवृत्तांत – |
| १२४ | दि. १४/०२/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक** |
| --- | **विनंती अर्ज – निरंक** |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव – निरंक** |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज -** |
| १२५ | स्थानिक संस्था कर विभागातील तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या ऑडीट लिपीकांच्या नव्याने नविकरण करणेबाबत. |
| १२६ | महानगरपालिका आस्थापनेवरील ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असणाऱ्या लघुटंकलेखक यांच्या नेमणूकीचे नविकरण करणेबाबत. |
| १२७ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कर विभागाअंतर्गत झोपडपट्टी व इतर मालमत्तांची कर आकारणी करणेबाबत. |
| १२८ | एअरटेल नेटवर्क व वोडाफोनच्या नविन प्लॅन बाबत. |
| १२९ | आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) (दि. १२/०२/२०१८ (दि. ०३/०२/२०१८ रोजीची तहकुब सभा) रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ८२) |
| १३० | विविध कामांच्या निविदांना मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) |
| १३१ | विविध कामांच्या निविदांना मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) |
| १३२ | मा. आयुक्त सो., यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) |
| १३३ | मा. आयुक्त सो., यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणेबाबत. (संगणक विभाग)<br>मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचारी/अधिकारी Adharbased MFS TAB for Biomatrix Attendence System खरेदी करणेबाबत. |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल - निरंक** |

**दिनांक :- १९/०३/२०१८**

(वासुदेव शिरवळकर)
**प्र. नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.२३/०३/२०१८

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. १२४ स्थानिक संस्था कर विभागातील तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या ऑडीट लिपीकांच्या नव्याने नवीकरण करणेबाबत.

स्थानिक संस्था कर विभागात तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर सध्या ०५ ऑडीट लिपीक या पदावर किमान वेतन रु. १५,३९३/- या ठोक मानधनावर कार्यरत आहेत. ०५ ऑडीट लिपीक कर्मचारी यांचा कार्यकाल दि.१५/०२/२०१८ रोजी संपुष्टात आला आहे. सदर कर्मचाऱ्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांची नावे | पदनाम | मुदत संपण्याची दिनांक |
|---|---|---|---|
| १. | श्री. सचिन सुपूगडे | ऑडीट लिपीक | दि.१५/०२/२०१८ |
| २. | श्री. सुशांत सुर्वे | ऑडीट लिपीक | दि.१५/०२/२०१८ |
| ३. | श्री. रविनाथ शिवगन | ऑडीट लिपीक | दि.१५/०२/२०१८ |
| ४. | श्रीम. हेमाली बावकर | ऑडीट लिपीक | दि.१५/०२/२०१८ |
| ५. | श्रीम. निशा पटेल | ऑडीट लिपीक | दि.१५/०२/२०१८ |

सदर बाबत सहा.आयुक्त (कर), परिवहन उप-व्यवस्थापक, उप-आयुक्त (आरोग्य) तसेच सहा.आयुक्त (स्थानिक संस्था कर) यांनी ०५ ऑडीट लिपीक कर्मचाऱ्यांची यापुढेही आवश्यकता असल्याने मुदतवाढीसाठी लेखी शिफारस केली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार नेमणुकीच्या नवीकरणासाठी मा. स्थायी समितीपुढे ठेवून मंजुरी घेणे उचित वाटते.

सबब सदर ०५ ऑडीट लिपीक यांची दि.१५/०२/२०८ रोजी संपूष्टात आली आहे. दि.१६/०२/२०१७ रोजी ०१ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन, दि.१७/०२/२०१७ ते दि.१६/०८/२०१८ पर्यंत ०६ महिन्यांकरीता नव्याने नेमणूक करणेस शिफारस आहे.

(बी.जी. पवार)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.२३/०३/२०१८

## ।। गोषवारा।।

मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

प्रकरण क्र.१२६ **महानगरपालिका आस्थापनेवरील ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असणाऱ्या लघुटंकलेखक यांच्या नेमणूकीचे नवीकरण करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात मा. स्थायी समिती ठराव क्र. १० अन्वये ०४ लघुटंकलेखक यांची किमान वेतन दरानुसार सहा महिन्यांकरिता नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यापैकी ०१ लघुटंकलेखकाने राजीनामा दिलेला आहे. उर्वरित ०३ लघुटंकलेखक कार्यरत आहेत.

मा.महासभा ठराव क्र.१३८ अन्वये व दि.०३/०३/२०१६ रोजीच्या मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत आयुक्त यांना सर्व विभागाचे किमान वेतनाबाबतचे दावे निकाली काढण्यासाठी प्राधिकृत केल्यानुसार किमान वेतन दरानुसार लघुटंकलेखक यांना वेतन अदा करण्यात येत आहे.

| अ.क्र. | लघुलेखकाची नावे | पदनाम | सध्या कार्यरत विभाग |
|---|---|---|---|
| १. | श्री.रविंद्र नागनाथ चव्हाण | लघुटंकलेखक | सामान्य प्रशासन विभाग |
| २. | श्री.अनिल तुकाराम बहिरम | लघुटंकलेखक | नगरसचिव विभाग |
| ३. | श्री.गुणवंत दयाराम सपकाळे | लघुटंकलेखक | नगरसचिव विभाग |

मा.स्थायी समिती सभा दि.०५/१२/२०१७ प्रकरण क्र.०४ ठराव क्र.०४ अन्वये सदर लघुटंकलेखकांच्या नियुक्तीस दि.२६/०९/२०१७ ते दि.२०/०३/२०१८ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्याअन्वये सदर लघुटंकलेखकांची मुदत दि.२०/०३/२०१८ रोजी संपुष्टात येणार आहे.

महानगरपालिका मा.महासभा, मा.स्थायी समिती सभा, आयुक्त व उपायुक्त (मुख्यालय) यांचे बैठकांचे इतिवृत्तांत, प्रभाग समिती सभा, वृक्ष प्राधिकरण समिती सभा, महिला बालकल्याण समिती सभा इत्यादी सभांचे इतिवृत्तांत लिहीण्यासाठी लघुटंकलेखकांची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार तात्पुरत्या नेमणुकीसाठी मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी घेणे अनिवार्य आहे.

महानगरपालिकेच्या कामाची निकड व आवश्यकता पाहता सदर लघुटंकलेखक यांना दि.२२/०३/२०१८ ते दि.२१/०९/२०१८ पर्यंत ०६ महिन्यांकरीता नव्याने नेमणुक देणेस मा.स्थायी समितीस शिफारस आहे.

(बी.जी.पवार)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.23/03/ २०१८

कर विभाग

।।गोषवारा।।

**प्रकरण क्र.२२५: मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कर विभागाअंतर्गत झोपडपट्टी व इतर मालमत्तांची कर आकारणी करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कर आकारणी न झालेल्या मालमत्तांची प्रत्यक्ष पाहणी करुन मोजमाप करुन कर आकारणी प्रस्तावित करणेकरीता महानगरपालिकेकडे अपुरे मनुष्यबळ असल्याने सदरचे काम करण्यास विलंब होत आहे. कर आकारणी न झाल्यामुळे महानगरपालिकेच्या महसूलावर परिणाम होत आहे. महानगरपालिकेच्या महसूलात वाढ होणे करीता नियमानूसार मालमत्ता कर लावणे आवश्यक आहे. त्याकरीता इतर महानगरपालिकेप्रमाणे प्रती मालमत्ता दरानुसार कर आकारणी करणेसाठी निविदा काढणेकरीता इतर महानगरपालिकांचे दर मागविण्यात आले आहेत.

त्यानुसार लातुर महानगरपालिका प्रति मालमत्ता दर र.रु ५३५/-, अकोला महानगरपालिका प्रति मालमत्ता दर र.रु ५५५/-, कल्याण डोंबिवली महानगरपालिका प्रति मालमत्ता दर र.रु. ४०८ + सर्व्हिस टॅक्स असे होते. सदर महानगरपालिकेचे दर पहाता सरासरी दर प्रती मालमत्ता र.रु. ४००/- या प्रमाणे निश्चित करुन अंदाजे २०,००० मालमत्ता सर्वेक्षणावर होणारा खर्च र.रु. ८०,००,०००/- (अक्षरी - र.रु. ऐंशी लाख मात्र) अपेक्षित आहे. सदर कामासाठी पुढिल वित्तीय वर्षातील मालमत्ता कर पुर्नमुल्यांकन या लेखाशिर्षातून अपेक्षिला आहे.

तरी सदर कामी प्रती मालमत्ता दरानुसार सर्वेक्षण करुन कर आकारणी करणेसाठी निविदा प्रक्रिया करुन अभिकर्ता नियुक्त करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मा. स्थायी समिती सभेची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस शिफारस असे.

**(बी. जी. पवार)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

मा. स्थायी समिती सभा दि. २३/०५/२०१८.

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. २२० :-** विविध कामांच्या निविदांना मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात विविध कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

१) भुयारी गटार योजना टप्पा-II, **DPR** बनविणे करीता सल्लागार नेमणेबाबत. (निविदा बी-२)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| १) मे. यश इंजिनियरींग कन्सल्टींग प्रा.लि. | रु.३०,००,०००/-<br>दर वाटाघाटीअंती रु.२९,००,०००/- |
| २) मे. एन.जे.एस. इंजिनियर्स इंडीया प्रा.लि | रु.९८,१०,०००/- |
| ३) मे. वाप्कोस लिमिटेड | रु.१,१९,००,०००/- |
| ४) मे. वॉटरनेट कन्सल्टींग सर्व्हिस प्रा.लि. | रु.१,३५,००,०००/- |

२) मिरा भाईंदर शहराकरीता पाणी पुरवठा योजनेसाठी **DPR** बनविणेकरीता सल्लागार नेमणेबाबत. (निविदा बी-२)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| १) मे. वॉटरनेट कन्सल्टींग सर्व्हिस प्रा.लि. | रु.४४,५५,०००/-<br>दर वाटाघाटीअंती रु.४३,००,०००/- |
| २) मे. वाप्कोस लि. | रु.१,२१,००,०००/ |
| ३) मे. एन.जे.एस. इंजिनियर्स इंडीया प्रा.लि. | रु.१,४२,००,०००/ |

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ या कामाकरीता **मे. यश इंजिनियरींग कन्सल्टींग प्रा.लि.** व अ.क्र. २ या कामाकरीता **मे. वॉटरनेट कन्सल्टींग सर्व्हिस प्रा.लि.** यांचे वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर निविदांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

D:\E DRIVE DATA\Rane\Goshwara\2017-18\Goshwara - Nivida Manjuri -NS-38-01 & 38-02.doc

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

मा. स्थायी समिती सभा दि.२३/०३/२०१८.

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. १३९ :- विविध कामांच्या निविदांना मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात विविध कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

१) भाईंदर (पू.) गोडदेव येथे मयुरी हॉटेल ते नर्मदा कुंज पर्यंत जलवाहिनी टाकणे.
(अंदाजित रक्कम रु.३६,४६,९००/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| १) मे. गणेश डेव्हलपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ०.९९% कमी दराने<br>वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा १.१०% कमी दराने |

२) पाणी पुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्था व देखभाल/दुरुस्तीसाठी सी.आय.पाईप पुरवठा करणेबाबत.
(अंदाजित खर्च रु.१,००,००,०००/-)

| पाईपचा व्यास | मे. केसरी ॲन्ड कंपनी यांनी सादर केलेले दर | वाटाघाटीअंती प्राप्त दर |
|---|---|---|
| 100 mm dia CI LA | 1580.00 (L1) | Rs.1535/- |
| 150 mm dia CI LA | 2530.00 (L1) | Rs.2450/- |
| 200 mm dia CI LA | 3710.00 (L1) | Rs.3589/- |
| 250 mm dia CI LA | 4900.00 (L1) | Rs.4770/- |
| 300 mm dia CI LA | 6350.00 (L1) | Rs.6148/- |
| 350 mm dia CI LA | 8390.00 (L1) | Rs.7740/- |
| 400 mm dia CI LA | 10150.00 (L1) | Rs.9400/- |
| 450 mm dia CI LA | 12310.00 (L1) | Rs.11392/- |
| 500 mm dia CI LA | 14460.00 (L1) | Rs.13356/- |
| 600 mm dia CI LA | 19300.00 (L1) | Rs.17829/- |

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ या कामाकरीता **मे. गणेश डेव्हलपर्स** व अ.क्र. २ या कामाकरीता **मे. केसरी ॲन्ड कंपनी** यांचे वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर निविदांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

अजा
१५५
२३/३/१८

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## संगणक विभाग
## मा.स्थायी समिती दि.२३/०३/2018
## // गोषवारा //

**विषय** :- मा.स्थायी समिती सभेत प्रस्तावाचे अवलोकन करणेबाबत.

**प्रकरण क्र. (१२२) मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचारी/अधिकारी उपस्थितीसाठी Aadharbased MFS TAB for Biomatrix Attendance System खरेदी करणे.**

मिरा भाईंदर महानगरपालिका संगणक विभागामार्फत विविध विभागांसाठी कर्मचा-यांच्या उपस्थितीसाठी Aadharbased Biomatrix Attendance System पुरवठा करणेकामी दि.१९/०१/२०१८ रोजी https://gem.gov.in या संकेतस्थळावर निविदा मागविण्यात आल्या होत्या. याकामी एकूण ११ निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त निविदापैकी खालीलप्रमाणे पात्र निविदाधारकांचा निविदेचा दराचा लिफाफा उघडणेत आला आहे. पात्र निविदाधारकांनी निविदेत खालीलप्रमाणे दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | M/s.ZENON SYSTEM PVT LTD Rate in Rs. per unit | M/S. CHESSY KNOWLEDGE QUOTIENT PVT.LTD., Rate in Rs. per unit | M/s.KJM GROUP SYSTEM SOLUTIONS Rate in Rs. per unit |
|---|---|---|---|
| 1. | रु.9,900.00 | रु.15,500.00 | रु.16,750.00 |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता, मे. झेनन सिस्टीम प्रा.लि., यांची कमी दराची निविदा स्विकाणेरस मा. निविदा समितीने दि.०३/०२/२०१८ रोजी शिफारस करण्यात आलेली आहे. याकामी मा. अति.आयुक्त् सा ो. यांची मंजूरी प्राप्त् झालेली आहे. याकामी रु.३,२६,७००/- खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त् प्रस्ताव महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(ड) नुसार मा.स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर.

(signature) 14/2/18

**(श्री. माधव कुसेकर)**
**अति. आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

o/c